सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.जा. ३८० ठ. क्र. 02 दि. 22/1/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडील अशोक लेलॅन्ड बसेसच्या चेसीस क्रॅक बाबत प्रस्तावात सविस्तर माहिती असून, प्रस्तावात नमूद कारणास्तव १) भारत सरकारच्या दि ऑटोमोटीव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया (A.R.A.I) पुणे या संस्थेकडून अशोक लेलॅन्ड कंपनीने तयार केलेले. इंजिनिअरींग सोल्यूशनला प्रमाणित केले असल्याने सदरचे रि इंन्फोर्समेंट किट उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यास बसेस बसवून मार्गावर पाठविणे योग्य होणार आहे. कारण बसेस बंद असल्याने प्रवांशाची व नागरिकांची गैरसोय होऊन आर्थिक नुकसान होत आहे. २) न्यायालयात नुकसान भरपाईबाबत दवा दाखल केल्यास होणारा विलंब लक्षात घेऊन व न्यायालयीन प्रक्रियेमुळे याबाबत पुढील कोणताही निर्णय घेणे शक्य होणार नसल्यामुळे अनेक वर्ष बसेस बंद राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. ३) उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने किटची वैधता मान्य केल्यास बसेसला रि इंन्फोर्समेंट किट बसवून बसेसचे वैधता प्रमाणपत्र दिल्यास मार्गावार देणे शक्य होणार आहे.

वरीलपैकी पर्याय क्रं.१ हा परिवहनच्या हिताचा असल्याने याबाबत निर्णय होणेस्तव मा.सर्वसाधारण सभेपूढे सादर करण्यास मा.प्र.आयुक्त यांचे दि.१२/०२/२०१६ चे टिपणीप्रमाणे आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

अशोक लेलॅन्ड कंपनी बरोबर झालेल्या करारपत्राप्रमाणे वारंटी पिरियडमध्ये चेसीस क्रॅक झालेल्या आहेत. त्यामुळे कंपनीने सर्व गाडयाच्या चेसीस बदलून देणे जरुरीचे आहे. सबब कंपनी विरुध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यांस मान्यता देणेत येत आहे. याशिवाय बसेस खरेदीमध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्याविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यांत यावी. कार्यवाही करण्यापूर्वी शेवटची संधी म्हणून चेसीस बदलून देणे व नुकसान भरपाई देण्यासाठी अशोक लेलॅन्ड या कंपनीला १५ दिवसाची लेखी नोटीस देण्यात यावी. तद्नंतर कंपनीविरुध्द दिवाणी व फौजदारी कार्यवाही करण्यांसही मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 369 ठ. क्र. 03
दि. 22/3/2016 रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



स्वच्छ भारत मिशन स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत सामुदायीक शौचालय बांधणे कामाचे पूर्वगणनपत्रक र.रु. १,०४,०२,४५८/- यांस मा. स्थापत्य समितीची मंजूरी मिळून मा. सर्वसाधारण सभेची सक्षम मंजूरी मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. १२-१-२०१६ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. १९६, दि. ५-२-२०१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~चालू~~/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.उ.369 ठ. क्र. 08 दि. 22/2/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



दि. ६-४-१९९५ नंतर मनपा सेवेमध्ये रोजंदारीवर कार्यरत असलेल्या सेवकांची यादी तयार करणे व प्रसिध्द केलेल्या यादीस मा.म.न.पा.ची मान्यता मिळणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात सविस्तर माहिती नमूद असून, प्रस्तुत प्रकरणी प्रस्तावातील E व F मध्ये नमूद केलेप्रमाणे माहिती असून तक्त्यामधील नमूद विविध संवर्गातील रोजंदारी/बदली वरील सेवकांचा सेवाप्रवेश, वयोमर्यादा तसेच सदरची पदे सरळसेवेची असल्याने जाहिरप्रसिध्दीकरणाची अट इत्यादी बाबी शिथील करुन अंतीम यादी प्रसिध्द करणेस मा.म.न.पा.ची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २-२-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सोलापूर शहराची हद्दवाढ झालेली असल्याने व कार्यरत कर्मचारी संख्या अपुरी पडत असल्याने आजला कार्यरत असलेले रोजंदारी सेवकांना आरोग्य विभाग, नगरअभियंता विभाग, सार्व. आ. अभियंता विभागाकडून कामावर घेण्यात आलेले आहेत. तसेच संबंधित विभागाने काही सेवकांना तत्कालीन परिस्थितीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात कामावर घेतलेले आहेत.

मा. आयुक्त यांचे दि.२-२-२०१६ चे टिपणीत नमूद केलेप्रमाणे प्राप्त प्रकरणातील सर्व यादयास मान्यता देणेत येत आहे. तसेच या व्यतिरिक्त भवानीराम सिकची धर्मशाळेकडील सेवकांना मनपा आस्थापनेवर घेणेबाबत मा.म.न.पा.ठराव क्र. ७३, दि. ४-६-२०१५ अन्वये सदर सेवकांची नांवे अंतीम यादीत घेणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच आरोग्य विभागअंतर्गत देवी विभागाकडील आरोग्य निरीक्षक पदाची शैक्षणिक पात्रता धारण करणारे ९ सेवकांची नांवे व प्राप्त यादीनुसार अंतीम यादीत नांवे समाविष्ठ करणेस मान्यता देणेत येत आहे. मुख्यलेखापाल कार्यालयाकडील संगणक चालक श्री. एफ. आय. पटनी यांचेबाबत मा. स्थायी समिती ठराव क्र. २१९, दि. ४-८-१५ व मा. म.न.पा. ठराव क्र. १९७, दि. १-१०-२०१५ नुसार सदर सेवक गेल्या ८ वर्षापासून कार्यरत असलेने त्यांचे नांव क.श्रे.लि. पदाच्या प्रतिक्षा यादीमध्ये समाविष्ठ करणेस मान्यता देणेत येत आहे. आणि उद्यान विभागाकडील ॲनीमल किपर श्री. भरत हरीदास शिंदे यांचे नांव यादीमध्ये समाविष्ठ करणे व मलेरिया विभागाकडील क्षेत्रकार्यकर्ता श्री. राजमणी बाबूराव डोळसे हे एस.आय. पदाची शैक्षणिक पात्रता धारण करीत असलेने त्यांचे नांव एस.आय.पदाच्या यादीमध्ये समाविष्ठ करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच नगरसचिव कार्यालयाकडे सन २००१ पासून नगरअभियंताकडील टेंपररी मस्टरवर झाडूवाली म्हणून असलेले ४ महिला कर्मचारी १) रुक्मीबाई रामप्पा म्हेत्रे २) जमलम्मा सिध्दराम बज्जर ३) सिध्दम्मा बसवण्णा आयगोळे ४) आजम्मा राम बंडोलू यांची नांवेही झाडूवाली पदाच्या यादीमध्ये समाविष्ठ करणेस मान्यता देणेत येत आहे.

महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण मंडळात एकवट मानधनावर गेल्या १० वर्षापेक्षा जास्त काळ बालवाडी शिक्षिका म्हणून काम करीत आहेत. ज्या बालवाडी शिक्षिकेने डी.एड. केलेला आहे. अशा बालवाडी शिक्षिकांना सहाय्यक शिक्षक म्हणून घेणेस महानगरपालिकेने यापूर्वी मान्यता दिलेली आहे. पात्रता धारण करणा-या डी.एड. पास असलेल्या केवळ तीन शिक्षिकांना सहाय्यक शिक्षक म्हणून नियुक्ती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

महानगरपालिकेत सध्या अवेक्षक/भूमापक या पदाची आवश्यकता आहे. परंतू म.न.पा. कंत्राटी पध्दतीने कामगार पुरवणारी संस्थेकडून अवेक्षक/भूमापक घेऊन काम करुन घेत आहे. यापुढे जे अवेक्षक/भूमापक हे महानगरपालिकेत प्रामाणिकपणे व चांगल्या प्रकारे सहा महिन्याची सेवा केली असेल अशा अवेक्षक/भूमापक यांना म.न.पा.च्या सेवेत घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रस्तुत प्रकरणी नमूद विविध संवर्गातील रोजंदारी/बदली वरील सेवकांचा सेवाप्रवेश, वयोमर्यादा, तसेच सदरची पदे सरळसेवेची असल्याने जाहिरप्रसिध्दीकरणाची अट इत्यादी बाबी शिथील करुन अंतीम यादी प्रसिध्द करणेस तसेच याबाबत यादीतील सेवकांना मनपा सेवेत समाविष्ठ करणेकामी शासनाकडे सविस्तर प्रस्ताव पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासुलो~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.३७४ ठ. क्र.०५
दि. २२/२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



स्मशानभूमीत रखवालदार म्हणून तात्पुरते स्वरुपात सेवक मिळणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव प्रस्तावात नमूद ठिकाणी कोणत्याही वेळी सकाळ, संध्याकाळ यावेळी लोक अंत्यविधीसाठी येत असतात सदर ठिकाणी दोन पाळीमध्ये सेवक उपलब्ध असणे आवश्यक आहे. तसेच ब-याच स्मशानभूमीमध्ये अनधिकृतपणे घुसखोरी होत असलेने तेथील मालमत्तेचे नुकसान होत असून याचा त्रास अंत्यविधीसाठी येणा-या नागरिकांना होत आहे. यास्तव सदर ठिकाणी आरोग्याधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार सेवकांची तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त करणे उचित होणार असून सदर सेवकांचे वेतन रोजंदारी दरानुसार आदा बिलाने आदा करणेकामी कार्यालय अधिक्षक यांनी मा. सहा. आयुक्त (स) यांचेकडे सादर केले असता मा. सहा. आयुक्त (स) यांनी ३० रखवालदार Service Provider कडून किंवा जाहिर प्रसिध्दीकरण करुन minimum wages act प्रमाणे कार्यवाही करुन उपलब्ध करुन द्यावेत असे वाटते. असे निवेदन मा. आयुक्त यांचेकडे सादर केले असता त्यावर मा. आयुक्त यांनी दोन पाळीत व्यवस्था असणे आवश्यक आहे. ही सेवा अत्यंत आवश्यक असून संवेदनशील प्रकारात मोडते त्वरीत G B कडे प्रस्ताव पाठवावा असे आदेश झाले असून, त्याप्रमाणे मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. ५-२-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामान्य/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३७८ ठ. क्र. ०६
दि. २२।२।१६ राजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मार्कंडेय उद्यान येथील स्वा. सावरकर यांचे विविध शिल्प उभारणेचे कामास बजेट तरतूद होवून मिळणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व नमूद कामाकरिता सन २०१४-१५ अथवा सन २०१५-१६ (भांडवली कामे शहरातील नवीन पुतळे बसविणे व पुतळे परिसर सुधारणा करणे) या बजेट सदरी अंदाजे र.रु. २०.०० लाख इतकी टोकन तरतूद करणेस सक्षम मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. ६-२-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासुली/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 369 ठ. क्र. 06
दि. 22/8/16 राजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यक्षेत्र, अधिकार, शक्ती व दर्जा इत्यादीबाबतची माहिती त्यानुसार महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत मा. राज्य निवडणूक आयोगाने पाठविलेले पत्र त्याअनुषंगाने मा. आयुक्त यांचे टिपणीतील महत्वाचे मुद्दे मा. सर्वसाधारण सभेत वाचून दाखविणे व माहिती घेणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २९-१-१६ चे टिपणीने आलेले प्रकरणाची माहिती घेतली.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 382 ठ. क्र. 08
दि. 22/3/96 ..... रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



श्री. मारुती जायप्पा गायकवाड वय वर्षे ४५, राहणार गरिबी हटाव झोपडपट्टी क्र. २ हे एक सुशिक्षीत बेकार तरुण आहेत त्यांना कोणतेही नोकरी किंवा उत्पन्नाचे साधन नाही ते खाजगी व्यवसाय करीत आहेत त्यावर त्यांच्या कुटूंबाचे उदरनिर्वाह होत होता परंतू अचानकपणे त्यांना पोटात दुखू लागल्याने श्री. मारुती गायकवाड यांना डॉक्टरांकडे दाखविले असता त्यांच्या पोटात खडे झाल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांच्या पोटाच्या विकारामुळे दवाखाना खर्च व औषधोपचारासाठी र.रु. ३०,०००/- इतका खर्च होणार असून त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीबीची असल्याने इतका खर्च करणे त्यांच्या कुवतीच्या बाहेर आहे. तरी श्री. मारुती जायप्पा गायकवाड यांना त्यांच्या आजारावर उपचार करण्यासाठी व पुढील औषधोपचारासाठी जास्तीत जास्त अर्थ सहाय्य देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रासुली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ३८८ ठ. क्र. ०९
दि. २२।७।१६ राजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका प्र.क्र. १९ ब मधील किसान नगर येथील श्री. भ्रमरांबिका मंदिर ते समाधान नगरकडे जाणा-या रस्त्यास व चौकास **श्री. महात्मा बसवेश्वर चौक** असे नामकरण करणेस, सदर ठिकाणी नामफलक लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रामुली~~/विशेष
सर्व साधारण सभेपुढील विषय क्र.ज ३८९ ठ. क्र. ९०
दि. २२/३/१६ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र. १९ ब अक्कलकोट रोड सोलापूर सुत मिल समोरील सिटी बस स्टॉपला **छत्रपती शिवाजी महाराज बस थांबा** असे नामकरण करणेस, सदर ठिकाणी नामफलक लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासुली~~/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४०७ ठ. क्र. ९९
दि. २२/३/१६ ........रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



टी.पी.३, फा.प्लॉट नं. २३ या मनपाच्या जागेत रस्ता रुंदीकरण व इतर कारणामुळे बाधीत झालेल्या घरांच्या जागा व बेघरांसाठी घरे याकरिता सदरच्या ठिकाणी सक्षम मान्यतेनुसार भाडे कराराने वाटप करणेत आलेले आहे. टी.पी.३, फा. प्लॉट नं. २३ ही घोषित झोपडपट्टी असून सदर ठिकाणी राहणारे नागरिकांचे नावे ते रहात असलेल्या घरांच्या जागा व घरे यांचे हस्तांतर चालू केल्यास मनपाचे उत्पन्नात भर पडेल. तसेच तेथील असणा-या नागरिकांनाही त्यांचे नावे घर झाल्याचा आनंद होईल व त्यांची प्रगती साधण्यास फार मोठी मदत होणार आहे. तरी यांना हस्तांतर चालू करण्यांस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव वगळणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका